VOL- VIII ISSUE- VII JULY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# भारतीय शेती व शेती क्षेत्रातील अनिश्चितता

**प्रा.पद्माकर बळीराम तटाळे**
अर्थशात्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय,कळे.
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**प्रस्तावना**

भारताची अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. स्वातंत्र्यानंतर जरी आपणास कृषीवरील अवलंबित्व जरी कमी झालेले दिसून येत असले तरी आजही 70 टक्के इतकी लोकसंख्या ही या क्षेत्रावरच अवलंबून असलेली दिसून येते. भारतात प्रामुख्याने शेती ही उदरनिर्वाहासाठी केली जाते. साधारणपणे शेतकऱ्याने उदरनिर्वाहासाठी किंवा धंदा म्हणून स्वतःच्या शेतीवर चालवलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने शेतीची व्याख्या केली जाते. भारतातील शेतीचा विचार केला तर प्रामुख्याने भारतातील शेती निसर्गावर अवलंबून आहे.त्यामुळे शेती व्यवसायात अनेक धोके व अनिश्चितता आढळून येते यातच पुर ,वादळ,अवर्षण, टोळधाड इत्यादी कारणामुळे शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चढ-उतार होताना आपणास दिसून येतात भारतातील शेतीच्या प्रकाराचा विचार केला असता शेतीचे वर्गीकरण चार प्रकारात केले जाते, ज्यात किसान प्रधान शेती, सामुदायिक शेती ,भांडवल प्रधान शेती ,सरकारी शेती चा समावेश होतो. किसान प्रधान शेती याचा विचार करता यात वैयक्तिक पणे शेतकरी स्वतःच्या पद्धतीने शेती करतात आणि आपल्या शेती व्यवसायाचे तेच व्यवस्थापन आणि संघटक असतात. सहकारी शेतीत अनेक शेतकरी एकत्र येऊन शेतीचा सर्वांचा सर्व किंवा काही कामे हे अनेक शेतकरी एकत्र येऊन स्वेच्छेने सहकारी पद्धतीने करतात तर सामुदायिक शेतीत सर्वसाधारणपणे व्यवस्थापक मंडळाच्या नियंत्रणाखाली एकत्र येऊन शेती केली जाते या प्रकारची शेती प्रमुखाने रशिया व चीन मध्ये थोड्याफार प्रमाणात आपल्याला दिसून येते. भांडवल प्रधान शेती ही शेती प्रामुख्याने अवाढव्य प्रमाणावर गुंतवणूक करण्याच्या भांडवली पद्धतीवर अवलंबून आहे तर सरकारी शेतीत शेतीची व्यवस्था ही सरकार आपल्या स्वतःचा नोकर वर्ग नेमून किंवा अधिकृत मंडळा प्रमाणे एखादी व्यवस्थापक मंडळ नेमून पाहत असते.

थोडक्यात, वरील प्रमाणे शेतीचे प्रकार जरी असले तरी भारतात किसान प्रधान शेती फार मोठ्या प्रमाणात केली जात असल्याचे दिसून येते.

**संशोधन लेखाचे उद्देश**

भारतीय शेती व त्यातील अनिश्चितता हा संशोधन लेख पुढील उद्देश समोर ठेवून लिहिण्यात आला आहे.

1. भारतीय शेतीच्या प्रकाराचा अभ्यास करणे
2. शेतीतील अनिश्चिततेचे स्वरूप समजून घेणे
3. शेतीच्या उत्पादनात अनिश्चितता निर्माण करणाऱ्या कारणाचा अभ्यास करणे
4. शेती क्षेत्रातील धोके व अनिश्चितता नियंत्रणाचे उपाय सुचवणे

वरील उद्देश समोर ठेवून प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यात आला आहे

**संशोधन पद्धती**

संशोधन लेख हा प्रामुख्याने दुय्यम आधारसामग्रीवर आधारित असून यात पुस्तके, दैनिक व मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या माहितीचा वापर करण्यात आला आहे.

भारतातील शेतीचा विचार करता, भारतातील शेती ही प्रामुखाने निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असलेली दिसून येते. आज ही हंगामात पाऊस वेळेवर पडला तर शेती मधून निघणारे उत्पादन हे योग्य प्रकारे पिकताना आपनास दिसून येते

त्यामुळे या क्षेत्रात अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्राच्या मानाने जास्त धोके असल्याचे आपणास दिसून येते याचा विचार केला असता भारतातील शेती क्षेत्रातील अनिश्चिततेचे स्वरूप खालील घटकामुळे आल्याचे आपणास दिसून येते.

**शेती क्षेत्रातील अनिश्चिततेचे स्वरूप**

1. किंमत अनिश्चितता

भारतातील शेतीतील उत्पादित होणाऱ्या मालाचा विचार केला असता आपणास असे दिसून येते की शेतकरी हा जरी उत्पादनाच्या प्रक्रियेचा संघटक असला तरी त्याचे उत्पादित होणाऱ्या मालाच्या किमतीवर नियंत्रण नसते या मालाची किमत ठरवणारा दूसरा घटक असतो तसेच शेतमालाच्या किमतीवर शासकीय धोरणाचा ही प्रभाव पडत असल्याचे आपणास दिसून येते.त्यामुळे शेतमालाच्या किंमतीत अनिश्चितता निर्माण होऊ शकते.

2. तांत्रिक अनिश्चितता

शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी आवश्यक असणारा घटक म्हणून तांत्रिक बाबीकडे पाहिले जाते नवीन तंत्र शेतकऱ्यांना उपयुक्त आणि फायदेशीर आहे किंवा नाही याबाबत हे विचार करावा लागतो जर अंदाज चुकला तर उत्पादन प्रक्रियेत जी अनिश्चितता निर्माण होते त्यास तांत्रिक अनिश्चितता असे म्हणतात. तांत्रिक अनिश्चिततेमुळे देखील शेतकऱ्यांना होणाऱ्या फायद्याचे प्रमाण बदलू शकते.

3. साधनाची अनिश्चितता

शेती ही अनेक घटकावर अवलंबून आहे यात शेतमजूर,भांडवल, बी बियाणे, खते इत्यादीचा समावेश या घटकांमध्ये होतो.यातील एका जरी साधनात असमतोल निर्माण झाला तर शेतीच्या उत्पादनात अनिश्चितता निर्माण होऊ शकते. याच बरोबर या साधना च्या किमती बाबतही अनिश्चितता असल्याचे आपणास दिसून येते.

4. कुळाबाबत अनिश्चितता

साधारण पुणे पूर्वी भारतात शेती ही कुळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात केली जात होती. आज थोड्या फार प्रमाणात या कुळाच्या माध्यमातून जरी शेती केले जात असले तरी यामुळे अनिश्चितता निर्माण झालेली दिसून येते कुळाला शेती करण्याबाबत शाश्वती नसते आणि मालकाला कुळाने कब्जा केला तर मालकी हक्कावर पाणी सोडावे लागेल अशी भीती असते त्यामुळे उत्पादनात कुळामुळे अनिश्चितता निर्माण होते.

5. उत्पादनाबाबत अनिश्चितता

शेतीच्या उत्पादनाच्या प्रक्रियेत नैसर्गिक आपत्ती, हवामान, रोगराई ,दुष्काळ, पूर यामुळे अनिश्चितता निर्माण होते त्यास उत्पादनाबाबत अनिश्चितता असे म्हणतात.

6.किमतीतील चढ-उतारामुळे निर्माण होणारी अनिश्चितता

शेतीमधून उत्पादित होणाऱ्या मालाच्या किमतींमध्ये सतत चढउतार होत असतात त्यामुळे देखील अनिश्चितता निर्माण होते.

**अनिश्चिततेचे कारणे**

शेतीच्या उत्पादनात अनिश्चितता निर्माण होण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत असलेले आपणास दिसून येतात त्यात खालील घटकांचा समावेश होतो. यात पाऊस, बी-बियाणे भांडवल हे घटक प्रामुखाने यावर परिणाम करताना दिसून येतात.

1. पाऊस-

कृषि उत्पादनासाठी आवश्यक असणारा घटक म्हणजे पाऊस. पाऊस जरर वेळेवर पडला तर शेतीमधून निर्माण होणारे उत्पादन हे भरपूर प्रमाणात निघते मात्र या उलट परिस्थिती जर पाऊस वेळेवर झाला नाही तर उत्पादनात घट देखील होऊ शकते.

2. बी- बियाणे

शेतीत वापरले जाणारे बी बियाणे योग्य गुणवत्तेचे नसले तरी देखील उत्पादनात अनिश्चितता निर्माण होऊ शकते त्यामुळे योग्य व प्रमाणबद्ध बी- बियाणे वापरणे गरजेचे आहे.

3. सरकारचे शेती विषयक धोरण

वेळोवेळी शासन आपले शेती विषयक धोरण जाहीर करत असते परंतु सरकारने शेती विषयक धोरण योग्य वेळी जाहीर न केल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक अंदाज चुकू शकतात व त्यामुळे या क्षेत्रात अनिश्चितता निर्माण होते बराच वेळा

शासन विविध पिकांबाबत हमीभाव जाहीर करीत असते.व त्या नुसार शेतकरी पीक पद्धती ठरवीत असतो जर शासनाने हमी भाव वेळेत ठरविले नाही तर अनिश्चितता निर्माण होऊ शकते.

4. भांडवल पुरवठा

भारतातील शेती ही संपूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे त्यामुळे शेतकरी या सतत आर्थिक विवेचनात असतो त्यामुळे त्याच्याकडे योग्य असा भांडवल साठा उपलब्ध नसतो त्यामुळे त्याला योग्य वेळी बँकेकडून कर्ज पुरवठा झाला नाही तर त्याचे नुकसान होऊ शकते परंतु जर हाच भांडवल पुरवठा योग्य वेळी शेतकऱ्यांला उपलब्ध झाला तर शेती उत्पादनाबाबत अनिश्चितता निर्माण होऊ शकत नाही.

5. शेतमाल किंमत

भारतातील शेतीमध्ये उत्पादित होणारे मालाची किंमत उत्पादक असणारा संयोजक म्हणजे शेतकरी निश्चित करत नाही तर व्यापारी अशा उत्पादित मालाच्या किमती निश्चित करत असतात. त्यामुळे शेतकऱ्याला त्याने उत्पादित केलेल्या मालाला उचित किंमत मिळेल का हे माहीत नसते त्यामुळे उत्पादित झालेल्या शेतमालाला योग्य किमत मिळाली नाही तर शेतकऱ्यांला या परिस्थितीत अतोनात नुकसान सोसावे लागते.

**शेतीक्षेत्रातील अनिश्चितता नियंत्रणाचे उपाय**

भारतीय शेतीचा विचार केला असता शेती क्षेत्रात अनेक अनिश्चितता आपणास दिसून येतात या अनिश्चिततेचे वर मात करण्यासाठी पुढील उपायाचा वापर केल्यास या अनिश्चितता दूर होऊ शकतात.

1. शेती क्षेत्राचे विविधीकरण

शेती क्षेत्रातील ही अनिश्चितता टाळण्यासाठी शेतकऱ्याने पारंपरिक पद्धतीने पिके न घेता या पद्धतीत बदल केला तर हे धोके टाळता येणे शक्य होऊ शकते पारंपारिक पद्धतीने एक पीक पद्धतीचा वापर न करता शेतकऱ्याने बहुविध पीक पद्धतीचा वापर केला तर एखाद्या कारणाने एखादे पीक अडचणीत आले तर त्याची भरपाई इतर पिकाच्या उत्पादनाच्या माध्यमातून करता येऊ शकते याच बरोबर केवळ शेतीमधून निघणाऱ्या उत्पन्नावरच अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी शेती सोबतच पूरक व्यवसाय केले तर होणारे नुकसान टाळता येऊ शकते.

2. योग्य पिकाची निवड

विविध पिकांच्या उत्पादनाचे प्रमाण,त्यांना लागणारा वेळ, उत्पादन व विक्री खर्च ,अनुभव इत्यादी बाबींचा अभ्यास करून योग्य अशी पीक पद्धती निवड केल्यास काही प्रमाणात तरी धोका व अनिश्चितता टाळता येणे शक्य आहे.

3.पीक रचनेत बदल

शेतकऱ्यांनी आपण देत असलेल्या पीक रचनेत बदल केला तर धोक्यांना व अनुसूचित दिला काही प्रमाणात आळा घालता येऊ शकतो करून दीर्घ मुदतीच्या पीक आवजी अल्पमुदती तयार होणारे पिकाचे उत्पादन घेतल्यास त्यापासून उत्पन्न महिन्यात देखील मदत मिळू शकते याचा अर्थ शेतकऱ्यांनी क्षेत्रात चाटर धोरण न अवलंबिता लवचिक धोरण स्वीकारणे आवश्यक आहे.

4. पुरेसे भाग भांडवल

शेती क्षेत्रात नैसर्गिक आपत्ती किंवा विविध आपत्ती आकाश मे अपने येण्याची शक्यता कांबळे येणाऱ्या संकटांना सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांकडे भांडवलाचा पुरेसा साठा असणे गरजेचे आहे जेणेकरून अचानक येणाऱ्या या संकटांना शेतकऱ्याला यशस्वी पुणे तोंड देता येईल.

5. पूरक उद्योगावर लक्ष केंद्रित करावे

शेतकऱ्यांनी केवळ शेती क्षेत्रावरच लक्ष केंद्रित न करता पूरक उद्योगावर देखील लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे करण शेतीही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतीमधून निघणारे उत्पादन किती निघेल याबाबत शेतकऱ्यांना शाश्वती शासन नसते त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीवर अवलंबून न राहता खरच पूरक उद्योगावर देखील लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

6. शेतमालाचा विमा उतरविणे

शेतकऱ्याने आपण घेत असलेल्या विविध पिकांचा विमा उतरविण्यास विम्याच्या हप्त्याच्या मोबाईल या शेतकऱ्याला किमान हमे मिळते व त्याचे नैसर्गिक व इतर

आपत्तीपासून सोरप्शन होते त्याचप्रमाणे किमान शेती उत्पन्नाच्या मुळे शेतीक्षेत्रात अस्थिरता निर्माण होण्यास एक प्रकारे मदत मिळू शकते.

7. बाजारपेठेचा अभ्यास

सर्व शेतकऱ्यांनी एकाच वस्तूचे उत्पादन केल्यास उत्पादनाच्या पुरवठ्यामध्ये वाढ होऊन त्या शेतमालाचे भाव कमी होऊ शकतात त्यामुळे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी बाजारपेठेचा अभ्यास करणे आवश्यक आहे बाजारपेठेमध्ये भविष्यात कोणत्या मालाला मागणी येऊ शकते याचा विचार करून जर शेतीमध्ये उत्पादन घेतल्यास शेतकऱ्यांना फायदा होण्याची शक्यता होऊ शकते.

8. उत्पादित मालाची गुणवत्ता टिकवणे

शेतीमधून निर्माण होणाऱ्या मालाची गुणवत्ता शेतकऱ्याने टिकून ठेवली तर शेतकऱ्याला त्या मालास योग्य किंमत मिळू शकते त्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादित माल कशाप्रकारे गुणवत्तापूर्ण राहील याकडे लक्ष दिले तर शेती क्षेत्रातील अनिश्चितता टाळता येऊ शकते.

**संदर्भसूची**


1. डॉ. कायदे पाटील गंगाधर, कृषी अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक
2. डॉ. देसाई, डॉ.भालेराव , कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय, निराली प्रकाशन, पुणे 3. डॉ. कविमंडन विजय, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर
4. डॉ. वाणी नीता, कृषी अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
5. डॉ दत्त डॉ सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, चांद अँड कंपनी लिमिटेड, दिल्ली


Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www aiirjournal.com